# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव सप्ताह, विशेष व्याख्यानमाला व विद्यापीठ ६ वा नामविस्तार दिनानिमित्त एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२६ ते ३१ मे, २०२५ त्रिशताब्दी जयंती सप्ताह साजरा करण्यात आला.

सप्ताहाचा उद्‌घाटन समारंभ सोमवार दि.२६ मे,२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता विद्यापीठाच्या मुख्य सभागृह येथे सप्ताह शुभारंभ कुलगुरु प्रा.डॉ. प्रकाश महानवर कार्यक्रम अध्यक्ष म्हणून लाभले. प्र-कुलगरु प्रा.डॉ. लक्ष्मीकांत ब.दामा. प्र.कुलसचिव डॉ.अतुल लकडे. डॉ.केदारनाथ काळवणे. संचालक, विद्यार्थी विकास विभाग. डॉ.प्रभाकर कोळेकर .संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र. सदर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन आणि कार्यावर मा.कुलगुरु महोदयाकडून मार्गदर्शन करण्यात आले.

**उद्‌घाटन मा.कुलगुरु महोदयांच्या हस्ते**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती सप्ताह दि.२६ मे, २०२५ रोजी आरोग्य शिबीर उद्‌घाटन करण्यात आले. वैघकीय अधिकारी डॉ.अभिजीत जगताप यांच्या पथकाकडून या शिबिराचे नियोजन केले होते. विद्यापीठातील आरोग्य संकुलाकडून आरोग्य तपासणी शिबिरात २५० जणांनी लाभ घेतला. विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिकांचे आरोग्य तपासणी करण्यात आली.

फोटो आरोग्य तपासणी

राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून प्रस्तुत विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जंयती निमित्त विद्यापीठा अंतर्गत संपुर्ण स्वच्छता करण्यात आली

**राष्ट्रीय सेवा योजना व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन संयुक्त विद्यमाने स्वच्छता**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती सप्ताह दि.२७ मे,२०२५ रोजी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आला होता.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती सप्ताह दि.२८ मे,२०२५ रोजी चित्रप्रदर्शन व ग्रंथ पद्रर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. चित्र प्रदर्शनामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या लढवय्या करारी बाणा, त्यांचे जीवनकार्य, त्यांनी निर्माण केलेले घाट, बारवा, मंदिराचा जीर्णोद्धार यांचे दर्शन होऊन अहिल्यादेवीचा जाज्वल्य इतिहास डोळयासमोर तळमतो.चित्र प्रदर्शन व ग्रंथप्रदर्शन उद्‌घाटन कुलगुरु प्रा.डॉ.पकाश महानवर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.डॉ.लक्ष्मीकांत दामा. प्र.कुलसचिव डॉ.अतुल लकडे, ज्ञानस्त्रोत केंद्राचे प्रभारी संचालक, अनिल घटवट, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, राष्ट्रीय सेवा योजना डॉ.राजेंद्र वडजे, परीक्षा व मूल्यमापन संचालक,श्रीकात अंधारे, वित्त व लेखाअधिकारी सीए.डॉ. महादेव खराडे. उपस्थित होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विद्यापीठाकडून तीन दिवस आयोजित करण्यात आले.

**चित्र प्रदर्शन व ग्रंथप्रदर्शन**

प्रमुख अतिथी म्हणून मा.ना.श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य उपस्थित होते. रणरागिणी, राजमाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी संबंध भारतभर बारा हजाराहून अधिक मंदिरांचा जिर्णोद्धार केला. पाण्यासाठी पाणवठे तसेच बारवे निर्माण करुन जलव्यस्थापनाचे उत्कृष्ट कार्य केले. त्यांचा आदर्श राज्यकारभार, युध्दनीती, न्यायव्यवस्था यातून सर्वांनाच प्रेरणा मिळते. असे गौरवोद्गार राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.चद्रकांत दादा पाटील यांनी काढले.

मा.ना.श्री जयकुमार गोरे. ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा पालकमंत्री सोलापूर यांनी आपल्या मार्गदर्शन पर भाषणात अहिल्यादेवीच्या आदर्श समाज व्यवस्था व आणि न्यायव्यवस्थेचे अनुकरण आजच्या पिढीने केले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केले. पीएम उषा योजने अंतर्गत नवीन इमारत भूमिपूजन व पायाभरणी समारंभ आयोजित करण्यात आला होता.याप्रसंगी आ.रणजितसिंह मोहिते-पाटील. अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्य, सर्व अधिकारी, कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठया संख्याने उपस्थित होते.